International Journal of Advance and Applied Research (IJAAR) ISSN – 2347-7075
Peer Reviewed Bi-Monthly Vol. 1 No.1
Sept – Oct 2013

मराठी

# ‘जान्हवी’ कादंबरी एक वेगळेपण वि. वा. शिरवाडकर

**डॉ.बाळासाहेब खोमणे**
एल्फिन्स्टन महाविद्यालय, मुंबई.

‘जान्हवी’ ही वि. वा. शिरवाडकर यांची उत्कृष्ट कादंबरी आहे. १९५२मध्ये ही कादंबरी प्रसिद्ध झाली. या कादंबरीत महंत, जान्हवी, वसुदेव आणि चित्रकार असी मोजकीच चार पात्रे आहेत. यातील प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा असा पूर्वइतिहास आहे. जान्हवी ही बालविधवा आहे. तिचे वडील देवाघरी गेल्यावर महंत तिची जबाबदारी घेतात. तिच्यावर चांगले संस्कार करतात. महंत म्हणजे गरिबांचे आश्रयस्थान. ज्ञान आणि तपश्चर्या यांचा संगम महंतांच्या ठिकाणी झाला होता. तिसरी व्यक्ती म्हणजे वसुदेव. एका इंग्रज अधिकाऱ्याच्या खुनाच्या कटात वसुदेव सहभागी होता. आपली धरपकड होईल म्हणून तो भूमिगत झाला आणि शेलारवाडीला महंत आणि जान्हवी यांच्या संपर्कात तो आला. हाच वसुदेव या कादंबरीचे कथानक आपल्या मुखातून सांगत आहे.

‘जान्हवी’ महंताकडे राहत असतांना न कळत तिच्या स्रीसुलभ भावना प्रकट होऊ लागतात. तिच्या स्रित्वाची तिला जाणीव होऊ लागते. महंताच्या मठातील जीवनापेक्षा वेगळे जीवन अनुभवावे असे तिला वाटते. कुंचल्याच्या सहाय्याने जगातील सौंदर्य कागदावर बध्द करणारा चित्रकार तिच्या आयुष्यात येतो. हे चौथे पात्र. हा चित्रकार जान्हवीच्या मनातील भावना कुंचल्याच्या सहाय्याने प्रकट करू लागतो. त्यातून दोघे एकमेकांकडे आकर्षित होतात. चित्रकाराचा जीवनविषयक दृष्टीकोन सौंदर्य टिपणारा, रसिक आहे. जीवनाचा आनंद घेणे हे त्याचे उद्दिष्ट जान्हवीला खूप पटते. चित्रकार तिच्याशी मोकळेपणाने वागतो. एका क्षणी चित्रकार आणि जान्हवी एकमेकांना आलिंगन देतांना महंत पाहतात आणि महंतांचा स्वतःवरचा ताबा सुटतो.

जान्हवीचे यौवन महंतांना अस्वस्थ करते. तपश्चर्या भंग पावते. महंतांची बांधून ठेवलेली निसर्गभावाना उफाळून वर येते. महंत एके रात्री जान्हवीच्या बिछान्याजवळ जातात. त्यांचा अतिशय वेगळा स्पर्श जान्हवीला जाणवतो. असले कृत्य करणारे महंत आहेत, हे समजल्यावर तिचे मन अस्वस्थ होते. वासनेने कहर केलेला असतो. महंत भौतिक सुखाकडे आकर्षित झालेले असतात. दुसऱ्या दिवशीही महंत पुनः जान्हवीशी जवळीक करण्याचा प्रयत्न करतात. जान्हवी कशीबशी महंतांच्या तावडीतून सुटका करून घेते. येथून पुढे कधीही महंतांच्या गडावर जाणार नाही असा ती निश्चय करते. वसुदेवला ही गोष्ट जेंव्हा समजते, तेंव्हा ते जान्हवीला चित्रकाराबरोबर निघून जाण्याचा सल्ला देतात. दोघेही गडावरून पायउतार होऊन निघून जातात. वसुदेव गडावर आल्यावर त्याला महंतांच्या पर्णकुटीस आग लागल्याचे दिसते. दुसऱ्या दिवशी त्याला महंतांचे अवशेष त्याला तेथे दिसतात. महंतांनी पश्चतापदग्ध होऊन स्वतःला जाळून घेतलेले असते. “एका महान तपस्व्याच्या जीवनाची ही शोकांतिका वाचकाला विचारमग्न बनविते. कादंबरी वाचून झाल्यावर ही शिरवाडकरांची एक सर्वांग सुंदर रमणीय अशी अजोड कलाकृती आहे हीच भावना मनात राहते”[१]

एकूणच 'जान्हवी' कादंबरीचे कथानक चार व्यक्तीबरोबर फिरते. जान्हवी ही या कादंबरीची नायिका आहे. महंताचे तिच्यावर मुलीसारखे प्रेम आहे. वसुदेवसारखी बंधुतुल्य व्यक्ती, तिच्या आयुष्यात येते. तर चित्रकार आणि तिच्यात तृप्तप्रीतीचा आविष्कार पाहायला मिळतो.

महंत पारमार्थिक आदर्श निर्माण करू पाहत होते. नैसर्गिक वासनेवर विजय मिळविण्यासाठी जीवनभर त्यांनी तपशर्या केली. परंतु शेवटी जान्हवीला चित्रकाराच्या बाहुपाशात पाहिल्यावर त्यांच्या मनातील मानवी नसर्गिक इच्छाशक्ती उफाळून वर आली. ही इच्छाशक्ती दडपली जात नाही. संपूर्ण शरीरावर विजय मिळविण्यासाठी त्यांनी आयुष्यभर तप केले. तेच शरीर त्यांच्यावर विजय मिळू पाहते म्हणून ते अस्वस्थ होतात. ज्या शरीरामुळे आपला नैतिक अध:पात झाला तेच शरीर ते नष्ट करतात. जान्हवीच्या जीवनात महंतांना पित्याचे स्थान आहे. लहानपणापासून त्यांच्या छायेत ती वाढली आहे. महंतांचे सुसंस्कार तिच्यावर झाले आहेत. म्हणूनच महंत तिच्याशी असभ्य वर्तन करतात, तरीही ती त्यांच्यावर रागवत नाही. ती जेंव्हा तिचा प्रियकर चित्रकार याच्याबरोबर जाण्याचा निर्णय घेते, तेंव्हा ती वसुदेवकडे महांतांसाठी निरोप ठेवते. तो अतिशय हृदयस्पर्शी आहे. जान्हवी त्यांच्यावर रागवली नाही, त्यांनी तसा समजही करून घेऊ नये. असा तिचा निरोप असतो.

या कादंबरीच्या निमित्ताने एक बालपण, तारुण्य, प्रौढत्व आणि वृद्धत्व अशा मानवी जीवनातील विकासाचे वर्णन येते. यात महंत यांची अभिलाषा मानवी जीवनातील नैसर्गिक तत्व स्पष्ट करते. निसर्गधर्म मानवी जीवनात चुकत नाही, ही गोष्ट येथे स्पष्ट होते. वि. वा. शिरवाडकर यांनी या कादंबरीच्या रूपाने मानवी जीवनातील सत्य सांगण्याचा प्रयत्न केला आहे, "शिरवाडकरांच्या तिन्ही कादंबऱ्या बाह्यतः भिन्न दिसत असल्या तरी त्यांचा अंतिम परिणाम एकच होत असतो आणि तो म्हणजे लेखकाने आपला आदर्शवाद आणि सांस्कृतिक, राजकीय व सामाजिक जीवनासंबंधी धारणा, स्त्रीपुरुषप्रेमातील नैसर्गिकता, त्यागाचे महत्व व सामान्य माणसाचे असामान्यत्व यांचा स्वाभावचित्रांच्या साह्याने घेतलेला शोध !"[२] या दृष्टीने वि.वा.शिरवाडकर महंत आणि जान्हवी यातील नाते ते स्पष्ट करतात.

चित्रकार आणि जान्हवी याच्यातील प्रेम ही तारुण्यअवस्थेतील महत्वाची घटना. सौंदर्यासक्त चित्रकाराकडे जान्हवीचे आकर्षित होत जाणे. ही घटना स्वतःला कुठेही बंदिस्त करीत नाही. तरुण्यात्तील आकर्षण, मुग्ध प्रेम, प्रेमाची निर्मलाता या सर्व गोष्टीचे प्रतिबिंब दोघांच्या व्यक्तिचित्रणात येते. जान्हवी आणि चित्रकार यांनी महंतांचा गड सोडला आहे, ते नव्या जीवनाला सामोरे जाणार आहेत. त्यामुळे ही कादंबरी नव्या वळणावर जाते. "जीवनाला सामोरे जाण्यातील औत्सुक्य आणि त्यातील स्वाभाविकता ही कादंबरीची तिसरी पातळी ठरते. नाजुक भावना-वासनांनी बांधला गेलेला माणूस व त्याच्या जीवनातील हर्षामर्षाचे क्षण व प्रणय भावनेची तरल अभिव्यक्ती यामुळे या कादंबरीला एक नवे परिमाण मिळाले आहे"[३] असे कादंबरीच्या यशस्वीतेचे वर्णन उषा मा. देशमुख यांनी केले आहे.

महंत आणि जान्हवी यांच्यातील नाते पिता-पुत्री असे आहे. लहानपणापासून जान्हवीचा सांभाळ महंतांनी केला आहे. महंतांच्या मनात जान्हवीविषयी अभिलाषा निर्माण झाल्यावरही जान्हवी स्थिर आहे. आध्यात्मिक आदर्श निर्माण करू पाहणारे महंत, विषय वासनेला बळी पडतात. जान्हवी त्यांच्यावर रागवत नाही, संतापत नाही, तर ती महंतांची अवस्था समजून घेते. यात जान्हवीची प्रगल्भता दिसून येते. या कादंबरीत जान्हवीचा मृदू ममतेचा आविष्कार विलोभनीय आहे. या संदर्भात शोभा देशमुख लिहितात, "स्त्रीसामर्थ्याचा जो वेध शिरवाडकरांनी त्यांच्या काव्य, नाटकातून घेतला आहे त्याचे प्रत्यंतर या कादंबरीत येते."[४]

वि. वा. शिरवाडकर यांनी मराठी साहित्यातील अनेक साहित्यप्रकारांवर लेखन केले आहे. तरीही कादंबरी क्षेत्रात त्यांची कादंबरी विशिष्ट स्थान का गाठू शकली नाही? लेखनातील सलगता, एकसंघपणा

आणि एकात्मभाव त्यात दिसत नाही.. "तर कादंबऱ्यातून विविध समस्या आणि विविध विषय स्वीकारले असले कादंबरी लेखनामागील व्यक्तिमत्व प्रबोधकाचे आहे. जीवन असे आहे यापेक्षा जीवन असे असावे याच आदर्शवादाने शिरवाडकरांचे कादंबरी लेखन झाले"[५] म्हणून कविता आणि नाटक या प्रकारांमध्ये त्यांना जे उत्तुंग यश लाभले तसे यश त्यांच्या कादंबरीला लाभले नाही.

एकंदरीत 'जान्हवी' कादंबरीत चार पात्राच्या सहाय्याने वि. वा. शिरवाडकर यांनी आदर्शवाद व्यक्त केला आहे. त्यात तत्कालीन कादंबऱ्या मध्ये येणारा स्वछंद्वाद आहेच. मानवी जीवनातील आदर्शवाद त्यांनी स्वीकारला असल्याने सामाजिक प्रबोधन करताना, मानवी अभिलाषा आणि नैसर्गिक भावना यांचे चित्रण करून सन्मार्ग सोडल्यावर होणाऱ्या परिणामाचे चित्रण या कादंबरीत त्यांनी केले आहे.

संदर्भ :-

१. शिरवाडकरांची नाटके, शोभा देशमुख, कवी कुसुमाग्रज आणि वि. वा. शिरवाडकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,प्रथमावृत्ती १९८४, पृष्ठ क्र. १४
२. कुसुमाग्रज साहित्यदर्शन, वैष्णव ते कल्पनेच्या तीरावर, उषा मा. देशमुख, शलाका प्रकाशन, प्रथम आवृत्ती मे १९८९, पृष्ठ क्र. २०३ – २०४
३. कुसुमाग्रज साहित्यदर्शन, वैष्णव ते कल्पनेच्या तीरावर, उषा मा. देशमुख, शलाका प्रकाशन, प्रथम आवृत्ती मे १९८९, पृष्ठ क्र.२०१
४. शिरवाडकरांची नाटके, शोभा देशमुख, कवी कुसुमाग्रज आणि वि. वा. शिरवाडकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,प्रथमावृत्ती १९८४, पृष्ठ क्र. १४
५. कुसुमाग्रज साहित्यदर्शन, वैष्णव ते कल्पनेच्या तीरावर, उषा मा. देशमुख, शलाका प्रकाशन, प्रथम आवृत्ती मे १९८९, पृष्ठ क्र. १९७